राजीनामा मंजूर होणे बाबत....
श्रीम मैथिली तानाजी नन्नवरे,परिचर (गट-ड)
पंचायत समिती जामखेड

अहिल्यानगर जिल्हा परिषद
सामान्य प्रशासन विभाग — १
जिल्हा परिषद आदेश क्र. साप्रवि-१/आस्था-४/५११/२०२६
अहिल्यानगर, दिनांक स्वाक्षरी खाली नमूद प्रमाणे

वाचा - १. सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र. एसआरव्ही-१०९२/१.३३/प्र.क्र. ३३/९२/८, दिनांक ०२ डिसेंबर १९९७
२. महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ मधील नियम ४६ (१)
३. गटविकास अधिकारी (उ.श्रे.), पंचायत समिती जामखेड यांचेकडील पत्र क्र. वशि/आस्था-१/७८३/२०२६, दि.२१/०८/२०२६

ज्याअर्थी, श्रीम मैथिली तानाजी नन्नवरे, परिचर यांची महानगर पालिका, पूणे येथे शिक्षण सेवक या पदावर निवड झालेली असलेने संदर्भ क्र. ०३ नुसार राजीनामा मंजूरीस्तव प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. संदर्भ क्र. ०१ मधील तरतुदींनुसार श्रीम मैथिली नन्नवरे, परिचर यांनी एक महिन्याचे वेतन लेखाशिर्षाखाली भरणा करुन संदर्भ क्र. ०३ अन्वये चलनाची प्रत सादर केलेली आहे.

संदर्भ क्र. ०३ अन्वये श्रीम मैथिली नन्नवरे, परिचर, पंचायत समिती जामखेड यांचेकडे कोणत्याही प्रकारचे शासकीय येणे प्रलंबित नसलेचे व कोणत्याही प्रकारची चौकशी चालु / प्रस्तावित अथवा प्रलंबित नसलेबाबतचा अहवाल प्राप्त झालेला आहे.

त्याअर्थी, संदर्भ क्र. ०१ मधील शासन निर्णयातील तरतुदीनुसार मी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर, मला प्रदान करणेत आलेल्या अधिकाराचा वापर करुन श्रीम मैथिली तानाजी नन्नवरे, परिचर, पंचायत समिती जामखेड यांनी परिचर गट-ड या पदाचा राजीनामा दिनांक २४/०६/२०२४ रोजीपासून दिलेला असल्याने श्रीम मैथिली नन्नवरे, परिचर यांच्या राजीनाम्यास दिनांक २४/०६/२०२४ पासून मंजूरीस कार्योत्तर मान्यता देत आहे.

सदर आदेशाची नोंद संबंधितांच्या मूळ सेवापुस्तकात घेणेत यावी.

सदर आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा सांकेतांक 202609222040165 असा आहे.

Digitally signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 22-09-2026 16:26:22
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

श्रीम मैथिली तानाजी नन्नवरे, परिचर, पंचायत समिती जामखेड
व्दारा व प्रत- गटविकास अधिकारी, पंचायत समिती जामखेड
प्रत - मुख्य लेखा व वित्त विभाग, जिल्हा परिषद अहिल्यानगर
प्रत - मुळ नस्ती